SIES College of
Arts, Science & Commerce
(Autonomous)
Sion (West), Mumbai - 400 022
Inward No : 5765
Date : 7/12/21
Receiver's Sign : [signature]

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) या योजनेअंतर्गत रुसा संचालनालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: रूसायो- २०१८/प्र.क्र.३४३/विशि-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ७ डिसेंबर, २०२१.

वाचा :-

(१) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि. २४/०६/२०२१.

(२) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.२४-४/२०२१-U. Policy (MH-Gen, ST. SC),दि. २५/०६/२०२१.

(३) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.२४-४/२०२१-U. Policy, दि.१४/०७/२०२१.

(४) राज्य प्रकल्प संचालनालयाचे पत्र क्र.राप्रसं/रुसा/२०२०-२१/२९६, दि.१५/०७/२०२१.

(५) राज्य प्रकल्प संचालनालयाचे पत्र क्र.राप्रसं/रुसा/२०२०-२१/२९९, दि.२७/०७/२०२१.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय शिक्षा अभियानांतर्गत मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.(२) व (३) येथील अनुक्रमे दि.२५ जून, २०२१ तसेच दि. १४ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये, रुसा १.० अंतर्गत महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा या घटकातंर्गत ३ महाविद्यालयांना तसेच रुसा २.० अंतर्गत विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा या घटकातंर्गत २ विद्यापीठे, महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा या घटकातंर्गत १० महाविद्यालयांना, Enhancing Quality & Excellence in Selected Autonomous Colleges अंतर्गत ७ महाविद्यालयांना व नवीन आदर्श महाविद्यालय, नंदुरबार यासाठी एकूण रु.१५,९०,९३,८५०/- इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

केंद्र हिस्सा (६०%) रक्कम रु.१५,९०,९३,८५०/- च्या प्रमाणात राज्य हिस्सा (४०%) रु.१०,६०,६२,५६७/- असा एकूण रु.२६,५१,५६,४१७/- (रुपये सव्वीस कोटी एकावन्न लाख छप्पन्न हजार चारशे सतरा फक्त) इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या खात्यामध्ये जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे केंद्र हिस्सा (६०%) रु.१५,९०,९३,८५०/- तसेच केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या प्रमाणात राज्य हिस्सा (४०%) रु.१०,६०,६२,५६७/- असा एकूण रु.२६,५१,५६,४१७/- (रुपये सव्वीस कोटी एकावन्न लाख छप्पन्न हजार चारशे सतरा फक्त) इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, राज्य प्रकल्प संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या खात्यामध्ये जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. राज्य प्रकल्प संचालनालयास केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केलेला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ/महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत घेण्यात यावीत.

४. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्या सोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदी प्रक्रिया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी आणि त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास विहित वेळेत सादर करण्यात यावे.

५. सद्य:स्थितीत राज्य प्रकल्प संचालनालयासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून राज्य प्रकल्प संचालक, रुसा यांना व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून राज्य प्रकल्प सहसंचालक, रुसा यांना घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी.

६. राज्य हिश्श्यावरील खर्च "मागणी क्रमांक- डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२- विद्यापीठांना सहाय्य, - (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा) (२२०२ आय २७२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली व केंद्र हिश्श्यावरील खर्च "मागणी क्रमांक - डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२- विद्यापीठांना सहाय्य, - (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा) (२२०२ आय २६३), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ मधील मंजूर तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि.२४/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ येथील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२६७/१४७१, दि. ०४/०८/२०२१ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७३८/२०२१/व्यय ५, दि. १०/०८/२०२१ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
५) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
८) संबंधित महाविद्यालयाचे/संस्थेचे प्राचार्य/संचालक
९) नियोजन विभाग (कार्यासन १४७१), मंत्रालय, मुंबई.
१०) वित्त विभाग (कार्यासन व्यय-५/कार्यासन अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
११) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४) उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१५) कार्यासन अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती (विशि-३).

| अ. क्र. | विद्यापीठाचे/ महाविद्यालयाचे नाव | केंद्र हिस्सा (६०%) (रु.) | समायोजित केलेले व्याज (केंद्र हिस्सा) (रु.) | व्याज समायोजित करुन वितरित केलेली रक्कम (केंद्र हिस्सा) (रु.) | राज्य हिस्सा (४०%) (रु.) | समायोजित केलेले व्याज (राज्य हिस्सा) (रु.) | व्याज समायोजित करुन वितरित करावयाची रक्कम (राज्य हिस्सा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रुसा १.० | | | | | | | |
| अ) महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Colleges) (३) | | | | | | | |
| १ | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ३०००००० | ० | ३०००००० | २०००००० | ० | २०००००० |
| २ | बळवंत महाविद्यालय, विटा | ३०००००० | १४७५४५ | २८५२४५५ | २०००००० | ९८३६३ | १९०१६३७ |
| ३ | सेंट फ्रान्सिस डी सेल्स महाविद्यालय, नागपूर | ३०००००० | २००३४२ | २७९९६५८ | २०००००० | १३३५६१ | १८६६४३९ |
| | एकूण | ९०००००० | ३४७८८७ | ८६५२११३ | ६०००००० | २३१९२४ | ५७६८०७६ |
| रुसा २.० | | | | | | | |
| ब) विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Universities) (२) | | | | | | | |
| १ | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | ३००००००० | ४०९२३६० | २५९०७६४० | २००००००० | २७२८२४० | १७२७१७६० |
| २ | कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक | ३००००००० | २०३८४९० | २७९६१५१० | २००००००० | १३५८९९३ | १८६४१००७ |
| | एकूण | ६००००००० | ६१३०८५० | ५३८६९१५० | ४००००००० | ४०८७२३३ | ३५९१२७६७ |
| क) महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा(Infrastructure Grants to Colleges) (१०) | | | | | | | |
| १ | शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी | ३०००००० | २८३४१० | २७१६५९० | २०००००० | १८८९४० | १८११०६० |
| २ | जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा | ३०००००० | २२५८८७ | २७७४११३ | २०००००० | १५०५९१ | १८४९४०९ |
| ३ | नागिनदास खांडवाला महाविद्यालय, मुंबई | ३०००००० | २६२९९९ | २७३७००१ | २०००००० | १७५३३३ | १८२४६६७ |
| ४ | एम.एस.काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर | ३०००००० | ११६४५० | २८८३५५० | २०००००० | ७७६३३ | १९२२३६७ |
| ५ | हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर | ३०००००० | ६५४३१ | २९३४५६९ | २०००००० | ४३६२१ | १९५६३७९ |
| ६ | जी.एस.वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, नागपूर | ३०००००० | १८४०५४ | २८१५९४६ | २०००००० | १२२७०३ | १८७७२९७ |
| ७ | सर विठ्ठलदास ठाकरसी गृह विज्ञान महाविद्यालय, मुंबई | ३०००००० | २२९४३२ | २७७०५६८ | २०००००० | १५२९५५ | १८४७०४५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | डेक्कन एज्युकेशन संस्थेचे बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे | ३०००००० | २६२८१९ | २७३७१८१ | २०००००० | १७५२१३ | १८२४७८७ |
| ९ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ३०००००० | १९५६६२ | २८०४३३८ | २०००००० | १३०४४१ | १८६९५५९ |
| १० | न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारनेर | ३०००००० | १५८७५३ | २८४१२४७ | २०००००० | १०५८३५ | १८९४१६५ |
| | एकूण | ३००००००० | १९८४८९७ | २८०१५१०३ | २००००००० | १३२३२६५ | १८६७६७३५ |
| ड) New Model Degree Colleges | | | | | | | |
| १ | न्यू मॉडेल डिग्री महाविद्यालय, नंदुरबार | १८०००००० | ० | १८०००००० | १२०००००० | ० | १२०००००० |
| | एकूण | १८०००००० | ० | १८०००००० | १२०००००० | ० | १२०००००० |
| इ) Enhancing Quality & Excellence in Selected Autonomous Colleges (७) | | | | | | | |
| १ | छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च, कोल्हापूर | ७५०००००० | ८७६०० | ७४१२४०० | ५०००००० | ५८४०० | ४९४१६०० |
| २ | धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा | ७५०००००० | ५०५७९ | ७४४९४२१ | ५०००००० | ३३७१९ | ४९६६२८१ |
| ३ | रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई | ७५०००००० | ५१०४२४ | ६९८९५७६ | ५०००००० | ३४०२८३ | ४६५९७१७ |
| ४ | यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा | ७५०००००० | २५२६७ | ७४७४७३३ | ५०००००० | १६८४५ | ४९८३१५५ |
| ५ | सिम्बॉसिस कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे | ७५०००००० | ४९३१०५ | ७००६८९५ | ५०००००० | ३२८७३६ | ४६७१२६४ |
| ६ | सेंट झेविअर्स महाविद्यालय स्वायत्त, मुंबई | ७५०००००० | ४५२७५८ | ७०४७२४२ | ५०००००० | ३०१८३९ | ४६९८१६१ |
| ७ | एसआयईएस कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई | ७५०००००० | ३२२७८३ | ७१७७२१७ | ५०००००० | २१५१८९ | ४७८४८११ |
| | एकूण | ५२५०००००० | १९४२५१६ | ५०५५७४८४ | ३५०००००० | १२९५०११ | ३३७०४९८९ |
| एकूण (अ+ब+क+ड+इ) | | १६९५०००००० | १०४०६१५० | १५९०९३८५० | ११३०००००० | ६९३७४३३ | १०६०६२५६७ |

२.            या संदर्भात झालेला खर्च सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता राज्य प्रकल्प संचालनालयाने सादर केली पाहिजेत.